FORM-I A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई शहर, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No.: 05, वर्ष Year: 2025, दिनांक Date: 22/01/2025

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988, कलमे Sections: 07
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना: वार मंगळवार, तारीख पासून 21/01/2025 वेळ 20:33, तारीख पर्यंत 21/01/2025 वेळ 21:45
   Occurrence of offence: Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S.: तारीख Date 21/01/2025, वेळ Time 16:00
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference: Entry No. 03/2025, तारीख Date 22/01/2025, वेळ Time 08:30

4. माहितीचा प्रकार Type of Information: ............, लेखी/तोंडी Written/Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence: (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ............, चौकी/बीट/दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ............
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव, जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण, गाव, पोस्ट, तालुका, जिल्हा, राज्य (Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road, Nearest identifiable Place, Village, Post, Taluka, Distt., State): सरकारमान्य अनुदानित, माध्यमिक शिक्षण मंडळ वर्ग क्र. 03, मुलुंड नाहिद हायस्कूल, रतनबाई वालाबाई महापालिका शाळा, तळमजला, आर. आर. टी. रोड, मुलुंड (प) मुंबई
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Distt., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant: Permanent Address.
   (a) नाव Name: संगीता शिंदे (b) वडीलाचे/पतीचे नाव Father's/Husband's Name: रविन्द्र शिंदे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: 45 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 9820682388
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: - दिल्याचा दिनांक Date of Issue: - दिल्याचे ठिकाण Place of Issue: - (f) व्यवसाय Occupation: गृहिणी
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: -, जनजात Sub-Caste: -
   (h) पत्ता Address: गल्ली/सर्वे नं. ............ घर/नाव नंबर House/Name No. ............ फोन/मो. नंबर Phone/M.No. ............ पॅन नं. Pan No. ............ वोटर्स नं. Card No. ............
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn., तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State, सध्याचा पत्ता Present Address: रुम नं. 116, वीर संभाजीनगर, छोटे चाळ, काळेश्वर मंदीराजवळ, एल. बी. एस. मार्ग मुलुंड (प) मुंबई

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   - श्रीमती संगीता श्याम शोयले वय 54 वर्षे पद - प्रभारी मुख्याध्यापक, सरकार मान्य माध्यमिक शिक्षण मंडळाचे मुलुंड नाहिद स्कूल मुलुंड पत्ता 7/D, पहिला मजला, परिमल बिल्डींग, जयदिप नगर भांडुप (पूर्व) मुंबई - 42 9619757017

Scanned with CamScanner

जबाब                                                    दि. 22/01/2025

फिर्यादी नामे: श्रीमती संगीता रविंद्र शिंदे वय-44 वर्षे धंदा-गृहिणी रा.ठी. रुम नं 115, वीर संभाजीनगर घोटी चाळ काळकेश्वर मंदिराजवळ जल. बी. डास. मार्ग, मुलुंड (प) मुंबई यांचा जबाब स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आला असून तीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature] 22/1/25

(विजय शिवराम पंचाळ).
सहा. पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Sangita
(संगीता शिंदे)

जबाब दि. २१/०१/२०२५

श्रीमती संगिता रविंद्र शिंदे वय ४४ वर्षे, व्यवसाय–शाखा प्रमुख, रा.ठी. रू.नं.११५ वीर संभाजी नगर, धोत्रे चाळ, काळकेश्वर मंदीराजवळ, एल.बी.एस.मार्ग, मुलुंड (प), मुंबई ४०००८०, मो.नं. ९८२०६८२३८८, आधार कार्ड क्र. ७७१८५४१०८४७४

---

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे जन्मापासून राहावयास आहे. माझे सोबत माझे पती गणेश रामचंद्र टेमकर ४९ वर्षे, माझा मुलगा सर्वेश गणेश टेमकर असे राहाण्यास आहेत. माझी मुलगी मेघना किरण शिंदे वय २५ वर्षे हिचे लग्न झाले आहे. माझे वडील दिवंगत रविंद्र हरी शिंदे हे शिवसेना शाखा क्र. ९८ चे शाखा प्रमुख होते. त्यांच्या निधनानंतर मी (शिवसेना शाखा क्र. १०८) या शाखेच्या शाखा प्रमुख म्हणून काम पाहू लागले. माझे प्राथमिक शिक्षण इयत्ता १ली ते ४ थी पर्यंत गोखले एज्युकेशन सोसायटी, गिरगाव, मुंबई येथे माझे मामाचे घराजवळील शाळेत झाले आहे. घरची गरीबी असल्याने मी पुढील शिक्षण घेवू शकले नाही. सन १९९७ साली माझे श्री गणेश रामचंद्र टेमकर यांचेशी लग्न झाले. लग्न झाल्यावर माझे सासरचे नाव सौ. संगिता गणेश टेमकर असे आहे. परंतु पत्रव्यवहार मी माझे जुन्याच नावाने करते.

मी शाखा प्रमुख म्हणून कामं करीत असताना आजूबाजूच्या लोकांचे विविध तक्रार अर्ज आमचे शाखेत येत असतात. सदर अर्जाचे वाचन करून त्याचा निपटारा करणेकामी माझे शिक्षण कमी असल्याने मला अडचणी येवू लागल्या म्हणून मी पुढील शिक्षण घेण्याचे ठरविले. आमच्या परिसरात ''मुलुंड नाईट हायस्कुल'' नावाची रात्रशाळा, वालभाई रतनभाई शाळा, राम रतन त्रिवेदी मार्ग, मुलुंड (प), मुंबई या ठिकाणी आहे. सन २०१८ मध्ये मी सदर शाळेमध्ये इयत्ता ८ वी करीता ॲडमिशन घेतले होते. ॲडमिशन घेताना मी माझे इयत्ता ४ थी चा शाळा सोडल्याचा दाखला नविन शाळेत जमा केला होता. सन २०१९ मध्ये मी इयत्ता ८वी पास होवून इयत्ता ९ वीत गेले होते परंतु नंतर कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्याने मला पुढील शिक्षण घेता आले नाही.

मी रात्रशाळा सोडताना शाळेचा दाखला न घेतल्याने दि.०४/०९/२०२४ रोजी मुंलुंड रात्र शाळा, मुंलुंड येथे मुख्याध्यापक गोखले मॅडम याचेकडे शाळेचा सोडल्याचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिला होता. मी शाळेत असताना आमचे वेळी मुख्याध्यापक श्रीमती कुलकर्णी मॅडम होत्या त्या रिटायर्ड झाल्या होत्या. सध्या मूख्याध्यापक म्हणून गोखले मॅडम आहेत. दि.०४/०९/२०२४ रोजी मी गोखले मॅडम यांना विनंती केली की, माझा शाळा सोडल्याचा दाखला दया. परंतु त्यानी त्या लेक्चर मध्ये व्यस्त आहेत. उशीर झाला आहे अशी कारणे सांगुन नंतर येण्यास सांगितले. मी पुन्हा दि.२४/१२/२०२४ रोजी शाळेत गोखले मॅडम यांना भेटले असता त्यावेळी पण त्यांनी दाखला देण्यास टाळाटाळ करून नंतर येण्यास सांगितले.

माझे सोबत रात्र शाळेकरिता असलेले विदयार्थी आरीफ शेख यांना शाळा दाखला देत नाही असे सांगितले असता त्याने मला त्यांचा देखील दाखला शाळेने दिला नसल्याचे सांगितले. माझा जावई नामे किरण याने देखील त्याच शाळेत शिक्षण घेतलेले असुन त्याचा देखील शाळा सोडल्याचा दाखला शाळा देत नाही.

दि. १३/०१/२०२५ रोजी सायं १९.३० वा मी, माझा जावई किरण शिंदे, मुलगी मेघना शिंदे, माझी विदयार्थी आसीफ ईस्माइल शेख असे मुलुंड रात्र शाळा, मुलुंड येथे शाळेचा दाखला घेणेकरिता गेले असता त्यावेळी मुख्याध्यापक हे लेक्चर ऐकत होत्या. काहीवेळाने त्या त्यांच्या केबीनमध्ये आल्या. त्यावेळी मी दाखला देणेबाबत विनंती केली असता त्यांनी मला रू. १२५०/– दयावे लागतील असे सांगितले. मी त्यांना पावती देण्याबाबत विनंती केली असता त्यांनी दोन वर्षाचे रू. १६०/– याची पावती मिळेल. बाकीचे पैसे आम्हांला लागतात. पैसे दिले तरच शाळा सोडल्याचा दाखला मिळेल. नाहीतर मिळणार नाही, असे सांगितले. तसेच माझा जावई किरण शिंदे यांच्याकडे दाखला देण्यासाठी रू.१२५०/– ची मागणी केलेली आहे.

मुख्याध्यापिका सौ. गोखले यांना लाच देण्याची मला इच्छा नसल्याने मी, माझे जावई किरण शिंदे व ''मुलुंड नाईट हायस्कुल'' या शाळेचा माजी विद्याथी आरीफ शेख यांच्यासह दि.२१/०१/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथील कार्यालयात आले. येथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटले असता त्यांनी मला सपोआ पांचाळ यांच्या कार्यालयात पाठविले. तसेच सपोआ पांचाळ आमच्या तक्रार

Scanned with CamScanner

अर्जावर कार्यवाही करतील असे आम्हाला सांगितले. मी माझे स्वहस्ताक्षरात तक्रार अर्ज लिहून सपोआ पांचाळ यांच्याकडे दिला. त्यानंतर कालावधीत सपोआ पांचाळ यांनी पो.नि दिघे, दोन शासकीय पंच आणि पोलीस पथकास बोलावून त्यांचेशी आमची ओळख करून दिली. सपोआ पांचाळ यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. सपोआ पांचाळ यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून सपोआ पांचाळ यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला. स.पो.आ पांचाळ यांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी क्र. ०८/२०२५ नुसार पडताळणी कारवाई करावयाची असल्याचे आम्हाला सांगितले. तसेच मी व लोकसेवक यांचेमधील प्रत्यक्ष भेटी दरम्यान होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. नमूद पडताळणी/सापळा कारवाईमध्ये पो.नि. दिघे या पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम करणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर सपोआ पांचाळ यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एसडी कार्डमध्ये प्रथम स्वत:चे, त्यानंतर माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर सपोआ पांचाळ यांनी मला, माझा जावई किरण शिंदे, पंच व पोलीस पथक असे लाप्रवि कार्यालयाच्या शासकिय वाहनात बसण्यास सांगितले त्याप्रमाणे आम्ही दोन शासकिय वाहनांमध्ये बसलो. मी सपोआ पांचाळ यांना शासकिय वाहन मुलुंडच्या दिशेने घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे चालकांनी सरकारी वाहन पुर्वदुर्तगती मार्गाने मुलुंड या ठिकाणी नेवून दोन्ही शासकिय वाहने आरआरटी रोड, सरस्वती पॅरोडीक्स बिल्डींगच्या जवळ, थांबविली. सपोआ पांचाळ यांनी मला व माझे जावयास लोकसेवक मुख्याध्यापिका मॅडम यांच्या कार्यालयात जावून कामा संदर्भात चर्चा करण्यास सांगितली. त्याप्रमाणे पो.नि. दिघे यांनी व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पो.नि. दिघे यांनी माझे कुर्ताच्या आतील बाजूस लावला. त्यानंतर मी, माझे जावई व पंच क्र. १ श्री. जगदिश बाबाराव कार वय ३८ वर्षे, असे लोकसेवक यांना जावून भेटले. लोकसेवकाच्या कार्यालयात गेल्यावर मी व माझे जावई यांनी लोकसेवक यांच्याशी कामाबाबत चर्चा केली. त्या चर्चेमध्ये लोकसेवक यांनी मला रू. ६५०/– व जावयांकडे रू. १२५० शाळा सोडल्याचा दाखल्या करीता भरण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांना लगेचच पैसे घेवून येते असे सांगून तेथून निघाली. झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले आहे. आमची लोकसेवकाशी चर्चा झाल्यावर आम्ही परत पोलीस वाहन थांबलेल्या ठिकाणी आलो. पोलीस पथकाला लोकसेवकाच्या कार्यालयात घडलेली सर्व हकीकत सांगितली. तसेच व्हाईस रेकॉर्डर वरील संभाषण ऐकल्यावर पोलीस पथकास आलोसे यांनी पैशांची मागणी केल्याची खात्री झाली.

त्यानंतर स.पो.आ पांचाळ यांनी माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ६५०/– व माझे जावई कडून रू. १२५०/– ची विचारणा केली असता आम्ही दोघांनी मिळून १९००/–रू. सपोआ पांचाळ यांच्याकडे दिले. सपोआ पांचाळ यांनी माझे कडुन व माझे जावयाकडून लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १९००/– ताब्यात घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांच्या छायांकित प्रतीचे मोबाईलवर फोटो काढुन घेतले. त्यानंतर सपोआ पांचाळ यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. सदर नोटांना अॅंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अॅंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर लाप्रविचे चालक ३३९८६/फटांगरे यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अॅंथ्रासीन पावडर लावून दिली. त्यानंतर मी दिलेली रक्कम माझे डावे हातात ठेवली. तसेच माझे जावयाने दिलेली रक्कम पुन्हा त्याने त्याचे शर्टाच्या खिशात ठेवली. तसेच आलोसे यांनी पैसे स्विकारल्यावर मी माझे कपाळावरील टिकली काढून पुन्हा लावायचा असा पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले.

सर्व तयारी झाल्यावर पो.नि. दिघे यांनी माझे कुर्ताच्या आतील बाजुस असलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे कार्यालयात मला पंचासोबत पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक हे सुध्दा काही अंतरावर होते. मी लोकसेवक त्यांच्या कार्यालयात गेले असता

समक्ष,

( विजय शिवराम पांचाळ ),
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Sangita
(संगिता शिंदे)

Scanned with CamScanner

लोकसेवक हे त्यांचे कार्यालयात उपस्थित होते. त्यावेळी लोकसेवक यांच्याशी कामासंदर्भात चर्चा झाली त्यावेळी फिर्यादी व लोकसेवक यांची चर्चा पुढील प्रमाणे झालेली आहे. हो सगळ... तुला अमाऊंट पण त्याच दिवशी सांगितली... बाराशे पन्नास... ईव्हन त्याच्या मागे पण आम्ही लिहुन ठेवलय... तुलाच नाही.. . प्रत्येकाला तुमची जे काही आहे ना ते लिहुन ठेवले आहेत... त्यांचे चेक करायचे आहेत परत... दोन दोनदा चेक करून मग ते द्यायचेत... आता हा बघ किती गोंधळ झालाय तो... म्हणजे हे रेकॉर्ड आधी मला चेक करायला लागेल... अरे पावती कुठली शाळा देत नाही... तुम्ही विचारा ना... कुठेही विचारा... आमची शाळा नाही... फक्त तुमची शालेय फी आहे मग त्याचीच पावती असते... कुठेही विचारा... हा म ते फी ची पावती दे त्यांना... बाकी सहाशे पन्नास घे आणि ह्यांचे बाराशे पन्नास घे... आणि ह्याची पण फी किती आहे ती बघ आणि फी ची पावती तेवढी त्यांना दे...

असे सांगुन त्यांनी माझेकडे लाचेची रक्कमेची मागणी केली असता मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम ६५०/– (रू. ५००/– दाराची १, रू. १००/– व रू. ५० दराची प्रत्येकी १ नोटा) लोकसेवक यांच्याकडे देवू केली असता त्यांनी ते पैसे टेबलावर बंचच्या खाली (रजिस्टरच्या खाली) ठेवण्यास सांगितले. तसेच माझा जावई किरण शिंदे यांनी त्यांच्याकडील कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम १२५०/– (रू. ५००/– दाराची २, रू. २००/– व रू. ५० दराची प्रत्येकी १ नोटा) ते सुध्दा लोकसेवक यांच्याकडे देवू केली असता त्यांनी ते पैसे टेबलावर बंचच्या खाली (रजिस्टरच्या खाली) ठेवण्यास सांगितले.

आरोपी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारताच मी पोलीस पथकास पाहून पुर्वनियोजीत इशारा केला. पोलीस निरीक्षक सुनिता दिघे, महिला पोलीस पाटील व पडेलकर यांनी तात्काळ आलोसे यांचा डावा व उजवा हात पकडून त्यांना जागीच अटकाव करून ठेवले. सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव व पद विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव सौ. संगिता शाम गोखले, प्रभारी मुख्याध्यापक म्हणुन सध्या कार्यरत असे असल्याचे सांगितले.

तरी, मुलुंड नाईट हायस्कुल शाळा या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगीता शाम गोखले यांनी माझा शाळा सोडल्याचा दाखला देणेकरिता रू.६५०/– इतकी पंचासमक्ष लाचेची रक्कमेची मागणी करून ती मला टेबलवर असलेल्या बंचच्या खाली (रजिस्टरच्या खाली) ठेवण्यास सांगुन ती पंचासमक्ष स्विकारली. त्याबाबत त्यांनी मला शासकीय पावती दिली नाही. ते पैसे शाळेच्या मदतीच्या नावाखाली त्यांनी स्वत:च्या फायदयासाठी स्विकारली आहे. तसेच माझा जावई किरण शिंदे याचा शाळा सोडल्याचा दाखला देणेकरिता रू.१२५०/– इतकी पंचासमक्ष लाचेची रक्कमेची मागणी करून ती त्याला टेबलवर असलेल्या बंचच्या खाली (रजिस्टरच्या खाली) ठेवण्यास सांगुन ती पंचासमक्ष स्विकारली. त्याबाबत त्यांनी माझे जावई यांना शासकीय पावती दिली नाही. ते पैसे शाळेच्या मदतीच्या नावाखाली त्यांनी स्वत:च्या फायदयासाठी स्विकारली आहे.

मुलुंड नाईट हायस्कुल शाळेच्या मुख्याध्यापक संगीता शाम गोखले यांनी माझा व माझे जावयाचा शाळा सोडल्याचा दाखला देणेकरीता रू.१९००/– रक्कमेची पंचासमक्ष लाचेची मागणी करून ती आम्हांला टेबलवर असलेल्या बंचच्या खाली (रजिस्टरच्या खाली) ठेवण्यास सांगुन ती पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी मुलुंड नाईट हायस्कुल शाळा या शाळेच्या मुख्याध्यापक संगीता शाम गोखले यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

मुलुंड नाईट हायस्कुल शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता शाम गोखले यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मला प्रिंट काढुन वाचण्यास दिला तो मी वाचला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर लिहिला आहे.

समक्ष,

( विजय शिवराम पांचाळ ),
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Sangita
(संगिता शिंदे)

Scanned with CamScanner

4064 8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ...... विनाविलंब

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

खालील वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी खालील कॉलम क्र 07 मधील आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्या माध्यमिक शिक्षण मंडळाचे [illegible] स्कूल मधील शाळा सोडल्याचा दाखला देण्यासाठी रु. 650/- इतक्या रकमेची पंचासमक्ष त्यांनी मागणी केली. नमूद रकम पंचासमक्ष टेबलवर असलेल्या बॅंचच्या खाली ठेवण्यास सांगून ती पंचासमक्ष स्विकारली. नमूद रकमेबाबत फिर्यादी यांना पावती दिली नाही. तसेच फिर्यादी यांचे [illegible] फिरणे पुढे [illegible] रु. 125 इतक्या रकमेची मागणी करून पंचासमक्ष टेबलवर असलेल्या बॅंचच्या खाली ठेवण्यास सांगून ती पंचासमक्ष स्विकारली. अशी एकूण रक्कम रु. 1900/- रकमेची रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी स्विकारली. म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S ..........:..........,
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.) (संगिता शिंदे)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..........विजय शिवराम पांचाळ
पदनाम Rank ..........सहा. पोलीस आयुक्त
तपासिक अं. चा कोड. क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ..........मुंबई

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner